स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, मानव्यविज्ञान विद्या शाखेअंतर्गत

राज्यशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पी.एचडी) पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या

शोधप्रबंधाचा संशोधन आराखडा

✼ संशोधन विषय ✼

‘‘महाराष्ट्र विधानसभेतील अनुसूचित जातीच्या महिला लोकप्रतिनिधींचा सहभाग,

एक चिकित्सक अभ्यास (कालखंड २००९ ते २०१९)

✼ संशोधक ✼

शिल्पा श्रीमंत खरात

✼ मार्गदर्शक ✼

प्रा.डॉ.विलास आघाव

सहयोगी प्राध्यापक व राज्यशास्त्र विभाग प्रमुख

आदर्श महाविद्यालय, हिंगोली

✼ संशोधन केंद्र ✼

पिपल्स महाविद्यालय, राज्यशास्त्र विभाग, नांदेड

सप्टेंबर २०२२

''महाराष्ट्र विधानसभेतील अनुसूचित जातीच्या महिला लोकप्रतिनिधींचा सहभाग : एक चिकित्सक अभ्यास'' (कालखंड २००९ ते २०१९)

प्रस्तावना (Introduction)

आज भारत हे एक जगातील सर्वात मोठे लोकशाही असलेले राष्ट्र म्हणून ओळखले जाते. स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी देशासमोर अनेक समस्या असताना देखील भारताने लोकशाही शासन प्रणालीचा स्वीकार केला आणि आज सात दशकानंतर देखील ही लोकशाही टिकवून ठेवली आहे. ही या देशाची एक खूप मोठी यशप्राप्त म्हणावी लागेल. सत्तेचा उपभोग हा लोकांच्या हितासाठी केला जावा आणि जास्तीत जास्त नागरिकांचा निर्णय प्रक्रियेत सहभाग असावा हा मुख्य विचार लोकशाहीच्या केंद्रस्थानी असतो.

देशाचा भौगोलिक आकार, सांस्कृतिक आणि भाषिक विविधता इत्यादींसारखे घटक लक्षात घेऊन राज्यकारभार सुरळीत चालवण्यासाठी संघराज्य पद्धतीचा देखील भारताने स्वीकार केला. संघराज्य पद्धतीनुसार दोन किंवा अधिक स्तरांवरून देशाचा राज्यकारभार केला जातो. त्यानुसार भारतामध्ये केंद्र आणि राज्य या दोन सत्ता केंद्रांवरून देशाचा राज्यकारभार केला जात आहे. सध्या भारतामध्ये २८ घटक राज्य आणि आठ केंद्रशासित प्रदेश आहेत. केंद्र आणि राज्य या दोन्ही पातळ्यांवर कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्याय मंडळ अशा तीन घटकांमध्ये सत्तेचे विभाजन करण्यात आले आहे. केंद्र स्तरावरील कायदेमंडळ व 'संसद' म्हणून ओळखले जाते तर राज्यस्तरावरील कायदेमंडळ हे 'विधीमंडळ' म्हणून ओळखले जाते. सध्या देशामध्ये असणाऱ्या २८ घटक राज्यांपैकी महाराष्ट्र हे घटक राज्य आहे. महाराष्ट्र हे एक पुरोगामी, नैसर्गिक साधन संपत्तीने समृद्ध आणि एक विकसनशील घटक राज्य म्हणून ओळखले जाते. देशाच्या स्वातंत्र्य लढ्यादेखील हा प्रांत नेहमीच आघाडीवर होता. अनेक संतांचा आणि समाज सुधारकांचा महाराष्ट्राला वारसा लाभलेला आहे. महाराष्ट्र राज्याचा राजकीय दृष्टीकोनातून जर आपण विचार केला तर महाराष्ट्राचे राजकारण हे मुख्यत: राज्याच्या राजकारणाचा केंद्रबिंदू असणाऱ्या विधीमंडळ या संस्थेभोवती फिरताना आपल्याला दिसते. विधीमंडळात राज्यपाल,

विधान परिषद आणि विधानसभा या तिन्ही घटकांचा समावेश होतो. विधान परिषद हे वरीष्ठ सभागृह असून ते स्थायी स्वरूपाचे आहे. यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था, विधानसभेतील सदस्य, पदवीधर शिक्षक इत्यादींचे प्रतिनिधी असतात. त्याबरोबरच राज्यपालांकडून नेमणूक करण्यात आलेले सदस्यदेखील असतात.

विधानसभा हे कनिष्ठ सभागृह आहे आणि या सभागृहाच्या दर पाच वर्षांनी नियमितीपणे निवडणूका होतात. या सभागृहामध्ये लोकांकडून प्रत्यक्षपणे निवडल्या गेलेल्या लोकप्रतिनिधींचा समावेश असतो. विधानसभा हे सभागृह प्रत्यक्षपणे लोकांचे प्रतिनिधीत्व करत असल्याने या सभागृहातील प्रतिनिधीत्वाला साहजिकच खूपच महत्त्व प्राप्त होते आणि म्हणून राज्याच्या लोकशाहीचा केंद्रबिंदू असणाऱ्या या सभागृहामध्ये राज्यातील सर्व समुदायांना प्रतिनिधीत्व मिळणे अपेक्षित आहे.

भारतीय राज्यघटनेने सर्व नागरिकांना समान राजकीय हक्क दिलेले आहेत. परंतु प्रत्यक्ष व्यवहारात मात्र या राजकीय हक्कांचा उपयोग करण्याची सर्वांनाच समान संधी मिळतेच असे नाही. कारण या देशातील जातव्यवस्था, पुरूषसत्ताक व्यवस्था यांसारख्या काही संरचनात्मक घटकांमुळे आणि त्यांच्या परिणामातून निर्माण झालेल्या आर्थिक दुर्बलतेमुळे काही समाजघटक निर्णय प्रक्रियेतून वगळले जातात आणि त्यांचा राजकीय सहभाग फक्त मतदान प्रक्रियेपुरता मर्यादीत होतो. ज्या समाजघटकांच्या राजकीय सहभागावर मर्यादा आलेल्या आहेत आणि ज्यांना निर्णय प्रक्रियेतून वगळण्याची (Exclusion) प्रक्रिया घडली आहे अशा समाज घटकांमधील महिला हा एक घटक होय. सामाजिक, सांस्कृतिक अडथळे, भेदभाव, हिंसाचार, साक्षरतेचे प्रमाण कमी असणे यांसारख्या समस्यांमुळे महिलांचा विधानसभेत सहभाग अत्यंत कमी आहे. खरेतर या घटकाची विधानसभेच्या राजकारणातून वगळण्याची (Exclusion) प्रक्रिया घडली आहे असे आपण म्हणू शकतो. कारण १९६२ ते २०१९ या कालावधीमध्ये विधानसभेच्या जवळपास अकरा सार्वजनिक निवडणूका झाल्या आहेत. त्यामध्ये एकूण ३१०८ आमदार निवडून आले आहेत. या ३१०८ आमदारांपैकी फक्त ११७ महिला होत्या. हे प्रमाण ३.७६% एवढे आहे.

लिंगभेद या घटकामुळे जर महिलांची विधानसभेच्या राजकारणातून वगळण्याची प्रक्रिया घडली आहे तर लिंगभेद या घटकाबरोबर जातव्यवस्था आणि पुरूषसत्ताक व्यवस्था या दोघींच्या परिणामातून निर्माण झालेली आर्थिक दुर्बलता यांचा सामना करणाऱ्या कनिष्ठ मानल्या गेलेल्या अनुसूचित जातीतील महिलांचा सहभाग कोणत्या स्वरूपाचा असेल याबद्दल प्रश्न निर्माण होणे साहजिक आहे. म्हणून या अनुसूचित जातीतील महिलांच्या विधानसभेतील सहभागाचा आणि या सहभागावर परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे हा प्रस्तावित संशोधनाचा मुख्य आशय आहे.

संशोधन समस्या (Statement of the problem)

महाराष्ट्राच्या विधानसभेच्या राजकारणामध्ये अनुसूचित जातीतील महिलांचा सहभाग कोणत्या स्वरूपाचा आहे? याचे सखोल विश्लेषण करणे आणि त्यांच्या राजकीय सहभागासमेरील आव्हाने कोणती आहेत? ते शोधणे, त्याचप्रमाणे लिंगभेद, जात, वर्ग इत्यादी घटकांनी या प्रवर्गातील महिलांच्या राजकीय सहभागावर कोणता परिणाम केला आहे? आणि तो राजकीय सहभाग वाढविण्यासाठी काय करता येईल हा या प्रस्तावित संशोधनाचा मुख्य हेतू आहे.

पूर्व संशोधनाचा आढावा (Review of literature)

महाराष्ट्रातील स्त्री वर्गावर बऱ्यापैकी संशोधन झाले आहे. यापैकी अनुसूचित जातीतील महिलांवर जे संशोधन झाले आहे त्यातील काही निवड संशोधनाचा पुढीलप्रमाणे आढावा घेतला आहे.

डॉ.वैशाली पवार यांनी ''महिलांच्या सत्तासंघर्षाचा आलेख'' या पुस्तकाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील सर्वच महिला वर्गाच्या विधानसभेतील सहभागाचे सखोल विश्लेषण केले आहे. विधानसभेप्रमाणेच मंत्रीमंडळातील महिलांच्या समावेशनाचाही त्यांनी आढावा घेतला आहे.

"Dr Phanit Phramaha Sutin among Buddist women" यांनी "socio economic" या विषयाच्या माध्यमातून awareness अनुसूचित जाती या जात प्रवर्गातील बौद्ध या एका

समाजातील स्त्रियांचा अभ्यास केला आहे. त्यामध्ये त्यांनी बौद्ध स्त्रियांच्या सामाजिक आणि आर्थिक घटकांबद्दल असणारे जागृतीवर प्रकाश टाकला आहे.

डॉ.निवृत्ती बाळासो यांनी ''पश्चिम महाराष्ट्रातील नागरी भागातील अनुसूचित जातीच्या महिला १९७५ ते २000'' या विषयाच्या माध्यमातून विशिष्ट असे पश्चिम महाराष्ट्र हे कार्यक्षेत्र ठरवून त्यामधील शहरी भागांमध्ये राहणाऱ्या अनुसूचित जातीच्या ज्या महिला आहेत त्यांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणित स्थितीवर सखोल संशोधन केले आहे.

''बौद्ध स्त्रियांचा मौखिक इतिहास: स्त्रीवादी आकलन'' या विषयाच्या माध्यमातून डॉ.धम्मसंगिनी शिंदे यांनी अनुसूचित जातीतील बौद्ध स्त्रियांचा एक बौद्ध स्त्री म्हणून ओळख घडण्याची जी प्रक्रिया आहे त्या प्रक्रियेचा आणि त्या प्रक्रियेवर परिणाम करणाऱ्या घटकांचा ऐतिहासिक आराखड्यातून अभ्यास केला आहे.

''Caste system and dalit feminism: a comparative study of Mang and Mahar women in Western Maharashtra'' या विषयाच्या माध्यमातून डॉ.स्मिता पाटील यांनी पश्चिम महाराष्ट्र या विभागातील अनुसूचित जातीतील महार आणि मातंग या जातीतील स्त्रियांचा शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय या घटकांच्या अनुषंगाने तुलनात्मक अभ्यास केला आहे आणि या स्त्रियांच्या राजकीय जागृतीवर देखील त्यांनी प्रकाश टाकला आहे.

डॉ.रामेश्वर काळे यांनी ''पंचायत राज व्यवस्थेतील ग्रामपंचायतीमध्ये अनुसूचित जातीतील महिला सरपंचाची भूमिका: एक अभ्यास विशेष संदर्भ मराठवाडा'' या विषयाच्या अनुषंगाने मराठवाडा या प्रशासकीय विभागातील स्थानिक स्वराज्य संस्था पातळीवरील ग्रामपंचायतीमधील सरपंचपदी राहिलेल्या अनुसूचित जातीतील महिला यांचा अभ्यास केला आहे.

महाराष्ट्रातील महिला वर्गावर बऱ्यापैकी संशोधन झाले आहे. महाराष्ट्रातील अनुसूचित जातीच्या स्त्रियांवर जे संशोधन झाले आहे त्यामध्ये या स्त्रियांच्या शैक्षणिक, सांस्कृतिक या बाजूंवर जास्त संशोधन झाले आहे परंतु त्यांच्या राजकीय आयामावर फारच कमी संशोधन

झाले आहे. राजकीय अंगाने जे संशोधन झाले आहे ते फक्त स्थानिक स्वराज्य संस्था या पातळीपर्यंतच मर्यादीत आहे.

संशोधन विषयाचे महत्त्व (Importance of research topic)

अनुसूचित जातीच्या महिलांचा राज्यस्तरावरील राजकारणातील सहभाग हा विषय मागील संशोधनांमधून दुर्लक्षित झालेला आहे. या घटकावर सविस्तरपणे प्रकाश टाकण्यात आलेला नाही. जगातील सर्वात मोठी लोकशाही असणाऱ्या या देशामध्ये वंचित घटकांना सत्तेत भागीदारी मिळत आहे का? त्यांना निर्णय प्रक्रियेमध्ये सामावून घेतलं जात आहे काय? एकूणच देशातील लोकशाहीचे स्वरूप समजून घेताना घटक राज्य स्तरावरील नागरिकांचा सहभाग कोणत्या स्वरूपाचा आहे?

यामध्ये समाजातील परिघाबाहेर असणाऱ्या मागास वंचित समुहांना प्रतिनिधीत्व मिळत आहे का? का ही लोकशाही फक्त अभिजन वर्गापुरतीच मर्यादीत झाली आहे? यांसारख्या घटकांचा अभ्यास होणे गरजेचे आहे आणि असाच एक परिघाबाहेर असणारा ''अनुसूचित जातीतील स्त्री'' या घटकाचा राज्य स्तरावरील राजकारणात असणारा सहभाग आणि त्या सहभागावर परिणाम करणाऱ्या घटकांवर हे संशोधन केले जाणार आहे. त्याचप्रमाणे अनुसूचित जातीतील स्त्रियांमधील राजकीय जागृतीचा आणि त्यांच्या राजकीय सहभाग समोरील आव्हानांचा आढावा घेतला जाणार आहे आणि म्हणून या संशोधनातून अनुसूचित जातीच्या महिलांच्या राजकीय आयामावरील सविस्तर माहिती पुढे येईल.

संशोधनाची उद्दीष्टे (Objectives)

(१) विधानसभेतील अनुसूचित जातीतील स्त्रियांच्या सहभागाचा अभ्यास करणे.

(२) अनुसूचित जातीतील महिलांच्या राजकीय सहभागावर प्रभाव टाकणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.

(३) अनुसूचित जातीतील स्त्रियांच्या विधानसभेतील सहभागापुढील आव्हाने कोणती आहेत त्याचा अभ्यास करणे.

(४) अनुसूचित जातीतील महिलांचा राज्य स्तरावरील राजकारणातील सहभाग वाढविण्यासाठी कोणते उपाय किंवा योजना राबविल्या गेल्या त्यांचा अभ्यास करणे.

गृहितके (Hypothesis)

(१) विधानसभेत अनुसूचित जातीतील स्त्रियांच्या सहभागाचे प्रमाण अतिशय कमी आहे.

(२) जातव्यवस्था आणि लिंगभेद यांसारख्या घटकांनी त्यांच्या राजकीय सहभागावर परिणाम केला आहे.

(३) कनिष्ठ सामाजिक दर्जा, आर्थिक दुर्बलता, शिक्षणाचे प्रमाण कमी असणे इत्यादी त्यांच्या राजकीय सहभागापुढील आव्हाने आहेत.

(४) महाराष्ट्राच्या विधानसभेच्या राजकारणात उच्च मानल्या गेलेल्या जातीतील आणि आर्थिक स्थिती प्रबळ असणाऱ्या नागरिकांचा आणि विशेषत: पुरुषांचा प्रभाव आहे.

(५) विधानसभेत भविष्यात महिलांना आरक्षण देण्यात आले तरी अनुसूचित जातीतील महिलांचा सहभाग संख्यात्मक दृष्ट्या वाढेल मात्र त्या सहभागाची परिणामकारकता वाढवण्यासाठी सरकार, निवडणूक आयोग यांनी काही धोरणात्मक स्तरावर मुलभूत बदल घडवून आणण्याची गरज आहे.

संशोधन पद्धती (Research Methodology)

या विषयातील संशोधनासाठी विश्लेषणात्मक पद्धत, वर्णनात्मक पद्धत आणि सर्वे पद्धत इत्यादींचा अवलंब करण्यात येईल.

तथ्य संकलन (Data Collection)

प्रस्तूत संशोधनासाठी प्राथमिक व द्वितीय साधनांचा वापर करण्यात येईल. प्राथमिक साधनांमध्ये अनुभवजन्य पद्धतीचा वापर येईल. सद्यस्थितीत विधानसभेत सक्रिय असणाऱ्या अनुसूचित जातीतील स्त्रियांचे अनुभव इत्यादींची माहिती मिळवण्यासाठी त्यांच्या मुलाखती घेऊन, चर्चा करून तसेच प्रश्नावली इ. माध्यमातून तथ्य संकलन करण्यात येईल.

द्वितीय साधनांमध्ये निवडक संदर्भ ग्रंथ, विधीमंडळातील दस्तावेज, अहवाल, नियतकालिके त्याचप्रमाणे वर्तमानपत्रे इ. दुय्यम साधनांचा वापर करण्यात येईल. तसेच अनुसूचित जातीच्या महिलांशी संबंधित शासनाची ध्येयधोरणे, अंमलबजावणी यांचा देखील आधार घेतला जाईल. इंटरनेट वरील माहितीचा वापर करण्यात येईल.

प्रकरणांची रूपरेषा (Tentative chapterisation)

प्रस्तूत संशोधन विषयाची मांडणी मुख्यत: सात प्रकरणांमध्ये करण्यात येणार आहे.

प्रकरण पहिले : प्रस्तावना

या प्रकरणामध्ये विषय प्रवेश महत्त्वाच्या संकल्पना आणि व्याख्या, ऐतिहासिक पार्श्वभूमी विषयाची उद्दीष्टे, महत्त्व, गृहितके इ. घटकांची चर्चा करण्यात येईल.

प्रकरण दुसरे : महाराष्ट्राच्या विधानसभेच्या राजकारणाचा आढावा

सदर प्रकरणाच्या राजकारणात सक्रिय असणारे विविध समाजघटक, राजकीय पक्ष आणि त्यांच्यातील सत्तासंघर्ष इ. घटकांची चर्चा करण्यात येईल.

प्रकरण तिसरे : महाराष्ट्रातील विधानसभेचे जात या घटकाच्या अनुषंगाने विश्लेषण

या प्रकरणात विधानसभेच्या निवडणूकांचे जातनिहाय विश्लेषण, प्रभावित केलेला विधानसभेच्या राजकारणाचा आकृतीबंध यावरून जातीने घटकाची चर्चा करण्यात येईल.

प्रकरण चौथे : महाराष्ट्राच्या विधानसभेची लिंग (Gender) या घटकाच्या अनुषंगाने विश्लेषण

या प्रकरणात विधानसभेचे स्त्री आणि पुरुष यांच्या सहभागाचे तुलनात्मक विश्लेषण करण्यात येईल.

प्रकरण पाचवे : महाराष्ट्र विधानसभा आणि अनुसूचित जातीच्या महिलांचा सहभाग

या प्रकरणात विधानसभेचे अनुसूचित जातीच्या महिला या घटकाला समोर ठेवून विश्लेषण करण्यात येईल. तसेच त्यांच्या सहभागाचे उपजात निहाय, धर्मनिहाय विश्लेषण करण्यात येईल. त्याबरोबरच विविध राजकीय पक्षांनी त्यांना दिलेली उमेदवारी इ. चा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण सहावे : अनुसूचित जातीतील महिलांची सामाजिक आणि आर्थिक स्थिती आणि त्यांचा राज्य पातळीवरील राजकारणातील सहभाग यातील परस्पर संबंध

या प्रकरणात राजकारण आणि आर्थिक स्थिती तसेच सामाजिक जनाधार यांतील परस्पर संबंध त्याचबरोबर अनुसूचित जातीतील महिलांचे व्यवसाय, उत्पन्न, कुटूंबांतर्गत आणि समाजामध्ये असणारा त्यांचा सामाजिक आणि आर्थिक दर्जा इ. घटकांचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण सातवे : निष्कर्ष आणि शिफारशी

या प्रकरणात प्रस्तूत संशोधनामधून निष्पन्न झालेले निष्कर्ष आणि त्यावर आधारीत महत्त्वपूर्ण शिफारशी यांचा समावेश असेल.

संदर्भ ग्रंथ सूची (Bibliography)

१. पळशीकर सुहास आणि कुलकर्णी सुहास २००७, ''महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष'' समकालीन प्रकाशन.

२. व्होरा राजेंद्र आणि पळशीकर सुहास १९९६, ''महाराष्ट्रातील सत्तांतर'' ग्रंथाली प्रकाशन.

३. पळशीकर सुहास आणि बिरमल नितीन ''महाराष्ट्राचे राजकारण, राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ'', प्रतिमा प्रकाशन.

४. पाटील भारती, ''स्त्रिया, समाज आणि राजकारण'', हर्मीस प्रकाशन, पुणे.

५. पवार वैशाली, ''महिलांच्या सत्तासंघर्षाचा आलेख'', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.

६. स्वाती देहाडराय आणि अनघा तांबे, ''स्त्रियांच्या चळवळी आणि संघटना''.

७. कांबळे संतोष ''स्त्री मुक्ती आणि स्त्री हक्क याबाबत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका''.

८. मुन मीनाक्षी, ''फुले आंबेडकरी स्त्री चळवळ''.

९. Patil Smita "Caste system and Dalit feminism: a comparative study of Mang and Mahar women in Western Maharashtra".

१०. Devaray Kusum D, "Behaviour of women, political consciousness among women".

Journals

१) सुगावा (१९९८), ''दलित महिलांचे प्रश्न''

२) सुगावा (२००४), ''दलितांच्या राजकारणाची दिशा''

३) Maureen L.P. Patterson "Caste and political leadership in Maharashtra, a review and current appraisal (The Economic Weekly)

४) Ishita Mehrotra "Political representation in Indian democracy, A view from the margins". (Journal of social studies)

✻ संशोधक ✻

शिल्पा श्रीमंत खरात

✻ मार्गदर्शक ✻

प्रा.डॉ.विलास आघाव

सहयोगी प्राध्यापक व राज्यशास्त्र विभाग प्रमुख

(पदवी पदव्युत्तर) आदर्श महाविद्यालय, हिंगोली